आदिवासी विकास विभागातील अनुदानित आश्रमशाळेतील किशोरवयीन विद्यार्थी व शिक्षक यांना जीवन कौशल्य विषयक प्रशिक्षण देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग,

शासन निर्णय क्र. अआशा-२०१८/प्र.क्र.१४२/का.११

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १० मे, २०१९.

<u>प्रस्तावना</u> :

राज्यातील अनुसूचित जमातीच्या व अनुसूचित क्षेत्रातील रहिवाश्यांच्या शैक्षणिक समस्या प्रभाविपणे सोडविण्याच्या दृष्टीने अनुसूचित जमातीमधील विदयार्थ्यांना मोफत निवासाची व भोजनाची सोय करावी आणि सेवा व सहकार्य ही प्रेरणा उराशी बाळगणा-या योग्य शिक्षकांच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली सधन मूलभूत शिक्षण देता यावे आणि अनुसूचित व डोंगराळ क्षेत्रातील अनुसूचित जनजातीच्या सामाजिक अर्थिक विकासाला गती मिळावी म्हणून क्षेत्र विकास दृष्टीकोनाचे धोरण स्वीकारुन त्याचा एक भाग म्हणून आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या .

२. दारिद्र, अज्ञान, अंधश्रध्दा व मद्यपान इत्यादीच्या कौटुंबिक पार्श्वभूमीपासून जनजातीतील मुलांना बाहेर काढून त्यांना शिक्षण, शिस्त व वैयक्तिक आरोग्य यासाठी उपयुक्त वातावरण निर्माण करणे, सामाजिक बदलांसाठी प्रेरणादायी भूमिका पार पाडण्यासाठी जनजातीच्या मुला व मुलींना तयार करणे, पध्दतशीरपणे प्रचार करून लोकांच्या साक्षरतेच्या प्रमाणातील अंतर कमी करणे, जनजाती व सर्वसामान्य लोकांच्या साक्षरतेच्या प्रमाणातील अंतर कमी करणे, विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्वतः क्रियाशील सहभागाचा पुढाकार घेण्यासाठी जनजाती समुहास सक्षम बनविणे ही आश्रमशाळा योजनेची मुख्य उद्दीष्टे आहेत.

३. कोणत्याही समाजातील पौगंडावस्थेतील मुले/मुली हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. मुलामुलींचे आरोग्य आणि कल्याण राज्याच्या संपूर्ण विकासाठी अत्यावश्क आहे. पौगंडावस्थेतील मुलांच्या शिक्षण आरोग्य आणि विकासाच्या संधीमध्ये येणारे अडथळे दूर केल्याने राज्याच्या एकूण मानव संसाधन विकासाला मोठाच हातभार लागणार आहे. सशक्त युवाशक्ती ही अर्थव्यवस्थेतील महत्वाची संसाधने आहेत. आदिवासी किशोरवयीन जीवन कौशल्य विकास कार्यक्रम हा आदिवासी समाजातील मुलामुलींचा विकास घडवून संपूर्ण समाजामध्ये सामाजिक व आर्थिक बदल घडविण्यास मदत करेल. यासाठी किशोरवयीन मुलांच्या शिक्षण पोषण, पाणी स्वच्छता कौशल्य व सबलीकरण याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे. हे सर्व लक्षात घेवून सन २०१७-१८

या शैक्षणिक वर्षात युनिसेफच्या सहाय्याने राजमाता बाल आरोग्य व पोषण मिशन यांच्या मार्फत शासकीय आश्रमशाळा तसेच एकलव्य निवासी शाळेतील किशोरवयीन मुला-मुलींना जीवन विकास कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्यास व प्रशिक्षणादरम्यान येणारा राहण्याचा सुविधा केंद्राचा साधनसामुग्री संसाधने पुस्तक छपाई प्रशिक्षणार्थी व सहभागी व्यक्तिंचा दैनिक व प्रवास भत्ता इ.वरील रु. २३१.१८ लक्ष इतक्या खर्चास शासन निर्णय दि.१०.१.२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली.

४. शासकिय आश्रमशाळा व एकलव्य निवासी शाळेतील पौगंडावस्थेतील मुलामुलींना देण्यात आलेल्या जीवन कौशल्य विषयक प्रशिक्षणाच्या धर्तीवर अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना तसेच मुलामुलींसाठी जीवन कौशल्य विषयक प्रशिक्षण कार्यक्रम सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :

१. युनिसेफच्या सहाय्याने राजमाता जिजाऊ माता आणि बाल आरोग्य आणि पोषण मिशन यांच्यामार्फत अनुदानित आश्रमशाळांतील पौगंडावस्थेतील मुलामुलींना जीवन कौशल्य विषयक प्रशिक्षण सन २०१९-२० या वर्षात देण्यासाठी शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रशिक्षणाचा उद्देश आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आरोग्य, पोषण, पाणी स्वच्छता आणि जिवन कौशल्य इ. विषयी योग्य ती माहिती देणे आहे. पौगंडावस्थेतील मुले व मुलींमध्ये माहिती समुपदेशन आरोग्यविषयक सूचना इ संदर्भात योग्य तो कौशल्य विकास घडवणे ज्यामुळे त्यांच्या समस्यांचे निराकरण त्यांना करता येईल तसेच मुलांमध्ये आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांना आत्मनिर्भर करणे हा देखील प्रशिक्षणाचा उद्देश आहे.

३. **प्रशिक्षण वर्ग :** या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत खालील सर्व गटांना प्रशिक्षण देण्यात येईल.

१) राज्य स्तरावर मास्टर ट्रेनर्स

२) अनुदानित आश्रमशाळेचे शिक्षक/ पुरुष व महिला अधिक्षक

३) अनुदानित आश्रमशाळेतील पौगंडावस्थेतील मुले मुली

मास्टर ट्रेनर्सना राज्य पातळीवरुन प्रशिक्षण देण्यात येईल. राज्यातील ५५६ अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकांना मास्टर ट्रेनर्स यांचेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. त्यानंतर प्रशिक्षित शिक्षकांच्या मार्फत ७ वी ते १२ वी पर्यंतच्या मुलांमुलींना साप्तहिक सत्रामध्ये प्रशिक्षण देण्यात येईल.

४. **प्रशिक्षण पध्दती** : प्रशिक्षणाची पध्दत ही पारंपारीक पध्दतीपेक्षा वेगळी असेल. संवादाच्या माध्यमातून आणि पौगंडावस्थेतील मुलां-मुलींना योग्य अशा पध्दतीने त्यांच्या समस्या समजून देण्यात येतील. प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्यांची संख्या आणि त्याचा प्रसार लक्षात घेता प्रशिक्षण ठराविक सत्रांमध्ये देणे जास्त योग्य आणि परिणामकारक ठरते. सबब सदर प्रशिक्षण तीन सत्रांमध्ये देण्यात येणार आहे.

५. **प्रशिक्षण कार्यपध्दती :** सदर प्रशिक्षण कार्यक्रमाची पध्दती खालीलप्रमाणे असेल.

अ) मास्टर ट्रेनर्सचे उजळणी प्रशिक्षण

१) शासकीय आश्रमशाळांतील प्रशिक्षणासाठी ज्या मास्टर ट्रेनर्सना यापूर्वी प्रशिक्षण दिले आहे त्यांना जिवन कौशल्य प्रशिक्षणामध्ये नव्याने अंतर्भूत केलेल्या मुद्दयांबाबत उजळणी होण्यासाठी २ दिवसांचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात येतील.

२) सन २०१७-१८ या वर्षामध्ये शासकीय आश्रमशाळांमधील ज्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे त्या शिक्षकांमधून ६० प्रशिक्षणार्थींची (अपर आयुक्त निहाय १५ प्रशिक्षणार्थी) निवड करण्यात येऊन त्यांना सन २०१९-२० या वर्षामध्ये मास्टर ट्रेनर्सचे ६ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येईल जेणेकरुन सदर मास्टर ट्रेनर्स पुढील कालावधीत आश्रमशाळांमधील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊ शकतील.

ब) मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण

जिवन कौशल्य प्रशिक्षणाची गरज, महत्व आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांना पटवून देण्यासाठी तसेच त्यांच्या शाळांतील जास्तीत जास्त शिक्षकांना व विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रेरित करण्यासाठी या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येईल.

क) आश्रमशाळेतील शिक्षकांचे प्रशिक्षण :

१) अनुदानित आश्रमशाळांतील काही शिक्षकांची निवड करुन त्यांना जिवन कौशल्य विषयक प्रशिक्षणासाठी मास्टर्स ट्रेनर्स म्हणून प्रशिक्षण देण्यात येईल.

२) ३५ प्रशिक्षणार्थींचा एक गट तयार करण्यात येईल.

३) प्रत्येक आश्रमशाळेतून ४ शिक्षकांना (२ पुरुष आणि २ महिला) प्रशिक्षण देण्यात येईल.

४) प्रत्येकी ३ दिवसांच्या ३ सत्रामध्ये प्रशिक्षण देण्यात येईल.

५) सदर सत्राची ३ तिमाहीमध्ये विभागणी केली आहे. प्रत्येक सत्रामध्ये विशिष्ट विषय हाताळला जाईल. (प्रत्येक भागासाठी ११ आठवडे)

६) पहिला भाग पूर्ण झाल्यावर दुसरा भाग सुरु करण्यात येईल. (११ आठवडे)

७) दुसरा भाग पूर्ण झाल्यावर तिसरा भाग सुरु करण्यात येईल. (११ आठवडे)

ड) विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण :

१) प्रशिक्षणात सहभागी शिक्षक ७ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना साप्ताहिक सत्रामध्ये प्रशिक्षण देतील.

२) वर नमुद केलेला ११ आठवडयाच्या कॅलेंडरनुसार ११ साप्ताहिक सत्रांमध्ये प्रत्येक भाग पूर्ण करण्यात येईल.

३) प्रशिक्षणाची गुणवत्ता उच्च राहण्याच्या दृष्टीने सदर सत्रामध्ये शिक्षकांना मदत करण्यासाठी मास्टर ट्रेनर्स उपस्थित राहतील.

६. **प्रशिक्षण प्रणाली :-** सदरचे प्रशिक्षण अभ्यासक्रमानुसार ९ दिवसांच्या विविध सत्रामध्ये देण्यात येईल. ज्यामध्ये मुलांची सुरक्षितता, आरोग्य, पोषण, स्वच्छता, वयात येणे आणि जीवन कौशल्य इत्यादी विषय शिकविण्यात येतील.

७. **प्रशिक्षणाचे नियोजन :-** प्रशिक्षणाची गुणवत्ता व कार्यक्षमता उच्च दर्जाची असावी म्हणून सदर प्रशिक्षणाचे नियोजन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

१) **मास्टर ट्रेनर्स :-** मास्टर ट्रेनर्स यांना पब्लिक हेल्थ इन्स्टिटयुट, नागपूर, यशदा/आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, वनामती नागपूर येथे ६ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येईल.

२) **शिक्षकांचे प्रशिक्षण :-** शिक्षकांना प्रत्येकी ३ दिवसांच्या ३ सत्रामध्ये विभागून प्रशिक्षण देण्यात येईल. शिक्षकांना सुध्दा पब्लिक हेल्थ इन्स्टिट्युट, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि आरोग्य विभागाच्या जिल्हा प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येईल.

शिक्षकांसाठीच्या प्रशिक्षणामध्ये काही कालावधीचे अंतर ठेवण्यात आले आहे. ज्यामुळे त्यांच्या प्रशिक्षणाशी निगडीत समस्यांचे निवारण करणे आणि त्यांना प्रशिक्षण देताना आलेल्या अनुभवांचे संकलन करणे शक्य होईल.

३) **विद्यार्थी :-** विद्यार्थ्यांकरीता ३३ सत्र प्रत्येकी ११ सत्राच्या भागामध्ये विभागीत करुन आश्रमशाळेत प्रशिक्षण देण्यात येतील.

८. **प्रशिक्षण साधन सामग्री :-** शिक्षक आणि पौगंडाव्यवस्थेतील मुले यांच्या प्रशिक्षणाकरीता लागणारी मराठी भाषेतील पुस्तिका आणि इतर साधने राजमाता जिजाऊ माता व बाल आरोग्य आणि पोषण मिशन यांनी युनिसेफ च्या सहकार्याने विकसित केली आहेत. प्रशिक्षण साधन सामग्रीमध्ये पौगंडावस्था, पोषण व आरोग्य, आरोग्यविषयीचे समज आणि कौशल्य इ. बाबतची माहिती समाविष्ट केले आहे. आश्रमशाळामध्ये जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रमाण राहील. तरी कार्यक्रम राबविताना सुधारणा आणि कल्पकतेसाठी बदल करण्यात येतील. प्रशिक्षणा दरम्यान आलेले अनुभव कार्यक्रमाच्या सबलीकरणासाठी आणि सुधारणेसाठी समाविष्ट करण्यात येतील.

९. **राज्यातील अनुदानित आश्रमशाळा व प्रशिक्षण द्यावयाच्या शिक्षकांची अपर आयुक्त निहाय माहिती खालील तक्त्यात दिली आहे**. प्रत्येक आश्रमशाळेतील ४ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येईल. एका गटात (बॅच) ३५ प्रशिक्षणार्थींचा समावेश असेल.

अ. क्र.	अपर आयुक्त	समाविष्ट जिल्हे	अनुदानित आश्रमशाळांची संख्या	प्रशिक्षण द्यावयाच्या शिक्षकांची संख्या	प्रशिक्षणार्थीचे गट (३५ प्रशिक्षणार्थी/ गट)	३ तिमाही मधील प्रशिक्षणार्थीचे एकूण गट
१	नागपूर	नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया	१४८	५९२	१६	४८
२	अमरावती	औरंगाबाद, अकोला, अमरावती, नांदेड, बीड, हिंगोली, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा	१२५	५००	१४	४२
३	ठाणे	ठाणे, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सोलापूर	७२	२८८	८	२४
४	नाशिक	नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर	२११	८४४	२४	७२
	एकूण		**५५६**	**२२२४**	**६२**	**१८६**

१०. **प्रशिक्षण खर्च व आर्थिक तरतूद :-** प्रशिक्षणा दरम्यान येणारा राहण्याचा, प्रशिक्षण केंद्राचा, साधनसामग्री, संसाधने, पुस्तकांची छपाई, प्रशिक्षणार्थी आणि सहभागी व्यक्तींचा दिवसाचा आणि प्रवास भत्ता इत्यादी खर्च आदिवासी विकास विभाग करेल. ३५ सहभागी व्यक्तीच्या प्रत्येकी एका प्रशिक्षणासाठी एका तिमाहीत रु.९३,२५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

तपशिल	३५ प्रशिक्षणार्थी व २ मास्टर ट्रेनर्स = ३७	एकूण खर्च
३ दिवसांसाठी जेवण व राहण्याचा खर्च, प्रशिक्षण केंद्राचे भाडे (प्रति प्रशिक्षणार्थी/प्रति बॅच रु.१७०२)	रु.१७०० x ३७	रु.६२,९००/-
स्टेशनरी व प्रशिक्षण साहित्य (प्रति प्रशिक्षणार्थी/प्रति बॅच)	रु.३५० X ३७	रु.१२,९५०/-
मानधन - मास्टर ट्रेनरसाठी (प्रती बॅच)	रु.३६०० x ३	रु.१०,८००/-
मानधन - बॅच को-ऑर्डीनेटर (प्रती बॅच)		रु.१५००/-
कार्यालयीन कर्मचारी		रु.३००/-
मानधन - लेखा सहायक		रु.१२००/-
प्रवासभत्ता - मास्टर ट्रेनर्स (प्रती बॅच)	रु.१२०० x २	रु.२,४००/-
इतर खर्च व आकस्मिक खर्च प्रति बॅच	----	रु.१२००/-
एकूण		**रु.९३,२५०/-**

उपरोक्त ३ मास्टर ट्रेनर्सपैकी एक मास्टर ट्रेनर हे संबंधित प्रशिक्षण केंद्राकडून पुरविले जातील.

११. सर्व अपर आयुक्तालय क्षेत्रातील सर्व अनुदानित आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावरील एकूण खर्च खालीलप्रमाणे आहे.

अपर आयुक्त	एकूण आश्रमशाळा	प्रशिक्षण द्यावयाचे शिक्षक संख्या	एका तिमाहीतील एकूण बॅचेस (प्रती बॅच ३५ प्रशिक्षणार्थी याप्रमाणे)	एका टप्प्यात प्रशिक्षणार्थींचे खर्चानुसार एकूण खर्च (रुपये)	एका वर्षात (२०१९-२०) ३ टप्प्यांचे प्रशिक्षणा-मधील एकूण बॅचेस	प्रशिक्षणाचा एकूण खर्च (रुपये)
उजळणी प्रशिक्षण		**६०**	**०२**			**१,८६,५००**
ठाणे	७२	२८८	८	७,४६,०००	२४	२२,३८,०००

नाशिक	२११	८४४	२४	२२,३८,०००	७२	६७,१४,०००
अमरावती	१२५	५००	१४	१३,०५,५००	४२	३९,१६,५००
नागपूर	१४८	५९२	१६	१४,९२,०००	४८	४४,७६,०००
एकूण	**५५६**	**२२२४**	**६२**	**५७,८१,५००**	**१८६**	**१,७५,३१,०००**

प्रशिक्षणासाठी २२२४ सहभागी व्यक्तींच्या ६२ वर्गाचा एका तिमाहीत रु.५७.८२ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे २२२४ सहभागी व्यक्तींच्या ६२ वर्गाचा तीन तीमाहीचा रु.१७३.४५ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच उजळणी प्रशिक्षणाच्या २ गटासाठी एकूण रु.१.८७ लाख इतका खर्च अपेक्षित असून सर्व प्रशिक्षणासाठी एकूण रु.१७५.३१ लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

१२. जिल्हानिहाय आश्रमशाळांच्या संख्येनुसार प्रशिक्षण केंद्राची निश्चिती व याबाबतचा सर्व समन्वय राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन यांच्याकडून करण्यात येईल.

१३. **प्रशिक्षण कालावधी :-** मास्टर ट्रेनर्ससाठीचे प्रशिक्षण मे २०१९ च्या मध्ये किंवा महिनाअखेरला करण्यात येईल. शिक्षकांचे प्रशिक्षण जुन २०१९ च्या पहिल्या आठवडयापासुन सुरु करण्यात येईल.

१४. **प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा :-** आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, राजमाता जिजाऊ माता व बाल आरोग्य आणि पोषण मिशन, सार्वजनिक आरोग्य विभाग, युनिसेफ आणि संलग्न अधिकारी संयुक्तरीत्या दर तिमाही नंतर कार्यक्रमाचा आढावा घेतील. त्यावेळी आर्थिक तरतुदींचाही आढावा घेतला जाईल.

राजमाता जिजाऊ माता आणि बाल आरोग्य पोषण मिशन यांच्या जबाबदाऱ्या :

१) मुलांमुलीसाठीची प्रशिक्षण साधने तयार करणे आणि त्यांची चाचणी करणे प्रशिक्षणाकरिता लागणारी पुस्तिका आणि इतर साधने राजमाता जिजाऊ माता व बाल आरोग्य आणि पोषण मिशन यांनी युनिसेफ च्या सहाकार्याने विकसित केली आहेत.

२) मास्टर ट्रेनर्सची शासनाच्या विविध संस्थामधून आणि सामाजिक संस्थेमधून निवड करणे.

३) राज्यस्तरीय संसाधन गटामार्फत मास्टर ट्रेनर्सचे प्रशिक्षण करणे.

४) पब्लिक हेल्थ इन्स्टिटयूट आणि आरोग्य खात्याचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण केंद्र याच्या सहयोगाने शिक्षकांचे प्रशिक्षण करणे.

५) कार्यक्रमाचे मुल्यांकन करण्याकरीता संस्थेची निवड करणे.

आदिवासी विकास विभागाकडून करावयाची कार्यवाही :

१) आर्थिक तरतूद करणे.

२) शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठवणे.

३) प्रशिक्षण सत्राची देखरेख आणि पर्यावेक्षण करणे, उदा. वेळेवर प्रशिक्षणाचे आयोजन.

१५. **मुल्यांकन समिती :** प्रशिक्षण कार्यक्रमाच्या मुल्यांकनासाठी आदिवासी विकास विभागाकडून समिती गठीत करण्यात येईल. सदर समिती खालीलप्रमाणे असेल. कार्यक्रमाचा आढावा घेण्याकरीता समितीची तिमाही बैठक घेण्यात येईल.

१) आयुक्त ,आदिवासी विकास नाशिक	अध्यक्ष
२) सर्व अपर आयुक्त ,आदिवासी विकास	सदस्य
३) आदिवासी विकास विभागाचे मंत्रालयातील प्रतिनिधी	सदस्य
४) युनिसेफचे प्रतिनिधी	सदस्य
५) सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी	सदस्य

१६. **देखरेख आणि मुल्यांकन :**दर महिन्याला कार्यक्रमाच्या प्रगतीचा अहवाल प्रत्येक शाळेमार्फत घेतला जाईल. या अहवालाच्या आधारावर प्रशिक्षणाचे मुल्यांकन प्रकल्प अधिकारी करतील. प्रकल्प कार्यालयांचे एकत्रित अहवाल अपर आयुक्तांमार्फत आदिवासी विकास आयुक्तालयास सादर केले जातील. बाहय संस्थेमार्फत आश्रमशाळेतील मुलांच्या प्रशिक्षणाचे तिमाही मुल्यांकन करण्यात येईल. मुल्यांकनासाठी संस्थेची नेमणूक युनिसेफ द्वारा केली जाईल. नेमणूक केलेली संस्था तिमाही प्रगतीचा अहवाल मुल्यांकन समितीच्या बैठकीत सादर करेल.

१७. सदर प्रशिक्षण कार्यक्रमावरील खर्च मागणी क्र टी-५ (०१) (७३) स्वयंसेवी संस्थाना आश्रमशाळा व मुलोद्योगोत्तर आश्रमशाळा चालविण्यासाठी सहायक अनुदान (कार्यक्रम) या लेखाशिर्षांतर्गत ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२२५ F१२९) या बाबीखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

१८. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०५१०१२३९४२९७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.05.10 12:44:20 +05'30'

(सु.ना. शिंदे)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव
५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.
१०. उपसचिव आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर.
१२. संचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, मुंबई.
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४. सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद.
१५. अवर सचिव (का-६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१७. महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१९. सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. निवड नस्ती, कार्यासन-११, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.